# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०६/०५/२०२४ (सोमवार) सायंकाळ**

---

## केबल वायर चोरी करणारा आरोपी नागपूर ग्रामीण पोलीसांच्या जाळयात

दिनांक ०३/०५/२०२४ रोजी फिर्यादी नामे— सुरज हिरामण अवचट वय २१ वर्ष रा. जसापुर जि. नागपूर यांचे वडीलांची मालकीची मौजा जसापुर शिवार शेतातील बोर मशीनला लावुन असलेली अंदाजे २० फुट वायर किंमत १५००/— रू. व फिर्यादीचे वडीलांची मालकीची शेतीला लागुन असलेली फिर्यादीचे मोठे वडील मोरेश्वर अवचट रा. जसापूर यांचे शेतातील बोर मशीनला लावुन असलेली २० फुट केबल वायर किंमती १५००/—रू. असा एकुण ४० फुट केबल वायर एकुण किंमती ३०००/—रू. चा मुद्देमाल आरोपीने कापून चोरून नेले. अशा फिर्यादीच्या तोंडी रिपोर्ट वरून आरोपीविरूद्ध पोस्टे बेला येथे अप. क्र. १४२/२४ अन्वये कलम ३७९ अन्वये गुन्हा नोंद केला होता.

सदर गुन्हयाचे तपासात बेला पोलीसांना मिळालेल्या गोपनिय माहिती वरून मौजा जसापूर शिवार येथुन **आरोपी नामे— निलेश पुंडलिक नन्नावरे वय २८ वर्ष रा. चोरा त भद्रावती जि चंद्रपुर** यास ताब्यात घेवुन त्यास गुन्हयाबाबत सखोल विचारपुस केली असता आरोपीने सदर चोरीचा गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपीकडुन ४० फुट वायर किंमती ३०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे बेला येथील ठाणेदार सहायक पोलीस निरीक्षक अजित कदम, सफौ. सुनिल आदमने, सुहास मासटवार यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर